शुक्रवार दि. ३१ जुलै २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३३० वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### जालना जलमय; महापौर वंदना मगरे यांची तात्काळ पाहणी

## महापौरांनी केवळ पाहणी आणि सूचना देण्यापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष अंमलबजावणीवर भर द्यावा

### गेल्या वर्षीच्या नुकसानीची भरपाई व अंडरग्राऊंड गाळ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न कायम; पार्किंग की गाळे?







**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरात गुरुवारी झालेल्या मुसळधार पावसामुळे अंबड रोड परिसरातील प्रभाग क्रमांक १६ अंतर्गत माऊली नगर येथे अनेक घरांमध्ये पावसाचे पाणी शिरल्याने नागरिकांची मोठी गैरसोय झाली. घटनेची माहिती मिळताच महापौर वंदना मगरे यांनी कोणताही विलंब न लावता घटनास्थळी धाव घेत परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांनी नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या तसेच संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.

महापौरांनी पाणी साचलेल्या रस्त्यांची, नाल्यांची आणि घरांमध्ये शिरलेल्या पाण्याची पाहणी करत महापालिकेच्या अभियंत्यांना त्वरित पाण्याचा निचरा करण्याच्या सूचना दिल्या. भविष्यात अशा प्रकारे नागरिकांच्या घरात पाणी शिरू नये, यासाठी आवश्यक त्या ठिकाणी जलनिस्सारण व्यवस्था सुधारण्याबरोबरच रस्त्यांची दुरुस्ती आणि कायमस्वरूपी उपाययोजना करण्यावर भर देण्याचे आदेश त्यांनी दिले.

यावेळी जालना महानगरपालिकेचे अभियंता सय्यद साऊद, संबंधित अधिकारी तसेच मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक उपस्थित होते. नागरिकांनी परिसरातील नाल्यांची अपुरी क्षमता, पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा न होणे आणि वारंवार उद्भवणाऱ्या जलभरावाच्या समस्येकडे महापौरांचे लक्ष वेधले. त्यावर महापौरांनी प्रशासनाला तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश देत नागरिकांना सकारात्मक प्रतिसाद दिला.

मात्र, या पाहणीदरम्यान नागरिकांनी गेल्या वर्षीच्या पावसाळ्याची आठवण करून देत अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले. मागील वर्षी झालेल्या मुसळधार पावसात शहरातील अनेक अंडरग्राऊंड गाळे आणि व्यावसायिक संकुलांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी शिरल्याने व्यापाऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले होते. त्या वेळी महापालिकेवर प्रशासकाचा कारभार होता. नुकसानग्रस्तांचे पंचनामे झाले नाहीत आणि भरपाईचाही विषय पुढे सरकला नाही, अशी खंत व्यापाऱ्यांनी व्यक्त केली.

आता महापालिकेत लोकप्रतिनिधी निवडून आल्यानंतर नागरिकांच्या अपेक्षा वाढल्या असून, महापौरांनी केवळ पाहणी आणि सूचना देण्यापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष अंमलबजावणीवर भर द्यावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. विशेषतः मागील वर्षी नुकसान झालेल्या व्यापारी व नागरिकांना शासनाकडून मदत किंवा भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न व्हावेत, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

याशिवाय शहरातील ज्या ठिकाणी अंडरग्राऊंड गाळे, व्यावसायिक संकुले किंवा पार्किंगची व्यवस्था आहे, त्या सर्व बांधकामांची तांत्रिक तपासणी करण्याची मागणीही पुढे (पान २ वर)

### जिल्हा उद्योग मित्र समितीसह पाच समित्यांची संयुक्त बैठक

## एमआयडीसी पायाभूत सुविधा, निर्यातवाढ, स्थानिकांना रोजगार आणि सिल्क हब विकासावर भर

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यातील औद्योगिक विकासाला चालना देणे, उद्योजकांच्या विविध समस्या सोडविणे, स्थानिक युवकांना रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देणे तसेच जिल्ह्याच्या निर्यातक्षमतेत वाढ करण्याच्या उद्देशाने जिल्हा उद्योग मित्र समिती, जिल्हास्तरीय सल्लागार समिती, आजारी उद्योग पुनर्वसन समिती, स्थानिक लोकांना रोजगारात प्राधान्य समिती आणि जिल्हा निर्यात प्रचालन समिती यांची संयुक्त बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

बैठकीस जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव योगेश सारणीकर, महापालिकेचे उपायुक्त त्रिंबक कांबळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपकार्यकारी अभियंता ए. एल. सगरुळे, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी अमित भामरे, एम आय डीसीचे उपअभियंता बी. व्ही. राऊत, एन एच एल एम एलचे प्रकल्प व्यवस्थापक विकास मलीक, औद्योगिक संस्थेचे प्रतिनिधी अर्जुन गेही, मेटा रोल्सचे शुभम सोनी तसेच उद्योजक सुनील रायठट्टा यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व औद्योगिक क्षेत्रातील प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीत जिल्ह्यातील औद्योगिक पायाभूत सुविधांच्या विकासासंदर्भात विविध महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. जुन्या एम आय डीसी क्षेत्राला जोडणाऱ्या कन्हैयानगर ते मंठा चौफुली या मार्गासाठी स्वतंत्र बायपास रस्ता विकसित करण्याचा प्रस्ताव, औद्योगिक वसाहतीत वाहनतळ व सार्वजनिक स्वच्छतागृहांची उभारणी, विद्युत सुविधांचे नूतनीकरण, जालना औद्योगिक वसाहतीसाठी सिटी बस सेवा सुरू करणे, समृद्धी महामार्गाच्या प्रवेशद्वाराजवळ फ्लायओव्हर उभारणे तसेच एमआयडीसीतील मुख्य व अंतर्गत रस्त्यांच्या दुरुस्ती व मजबुतीकरणाच्या कामांचा आढावा (पान २ वर)

## मुसळधार पावसाने जालन्यात जलमय स्थिती

*लक्ष्मीनारायणपुरा येथील नाली तुंबल्याने परिसरात पाणीच पाणी

*नालेसफाईतील हलगर्जीपणामुळे रस्त्यांना नद्यांचे स्वरूप, नागरिक संतप्त





**जालना । प्रतिनिधी**

गुरुवारी झालेल्या मुसळधार पावसामुळे जालना शहरातील जुना जालना परिसर पुन्हा एकदा जलमय झाला. वेळेवर नालेसफाई न झाल्याने पावसाचे पाणी रस्त्यांवर साचून अनेक भागांना अक्षरशः नद्यांचे स्वरूप प्राप्त झाले. अनेक रस्त्यांवर गुडघाभर पाणी साचल्याने वाहनचालक, पादचारी, व्यापारी आणि स्थानिक नागरिकांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या. या घटनेमुळे जालना महानगरपालिकेच्या पावसाळापूर्व नियोजनावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, पावसाळा सुरू होण्यापूर्वी नाले व गटारींची नियमित साफसफाई होणे अपेक्षित असताना अनेक ठिकाणी ती केवळ कागदोपत्रीच झाल्याचे दिसून येत आहे. परिणामी, मुसळधार पावसाचे पाणी वाहून जाण्याऐवजी रस्त्यांवरच साचले. काही भागात घरांमध्ये व दुकानांमध्येही पाणी शिरल्याने नागरिकांचे आर्थिक नुकसान झाले.

जालना शहरातील लक्ष्मीनारायणपुरा परिसरात गंभीर पाणी साचण्याची समस्या निर्माण झाली. नाली तुंबल्याने एपी पेट्रोल पंप तसेच उद्योजक वीरेंद्र पटेल (पान २ वर)

### जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांची दुहेरी कार्यवाही

## देवमुर्ती सज्जा येथे दप्तर तपासणी, व्ही.सी.द्वारे सर्व मंडळ अधिकारी व तलाठी यांची आढावा बैठक

**जालना -प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी आज जालना तालुक्यातील देवमुर्ती सज्जा येथे अचानक भेट देऊन तलाठी दप्तराची सखोल तपासणी केली. यावेळी त्यांनी महसुली अभिलेख, फेरफार नोंदी, ७/१२ उतारे, ई-अभिलेख, प्रलंबित प्रकरणे तसेच शासनाच्या विविध महसुली योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला.



तपासणीदरम्यान जिल्हाधिकारी यांनी अभिलेखांची बारकाईने पडताळणी करून दप्तर अद्ययावत ठेवणे, नागरिकांना वेळेत व पारदर्शक महसूल सेवा उपलब्ध करून देणे, ई-ऑफिस प्रणालीचा प्रभावी वापर करणे तसेच शासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश दिले.

त्यानंतर जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली जालना जिल्ह्यातील सर्व मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांची व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीमध्ये महसूल विभागाच्या विविध प्राधान्याच्या विषयांचा सविस्तर आढावा घेऊन आवश्यक सूचना देण्यात आल्या.बैठकीत विशेषतः मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण (), कुणबी जातप्रमाणपत्र वाटपासाठीची कार्यपद्धती (), ई-नोटीस, , ई-ऑफिस, स्वयंचलित हद्दवाचन केंद्रांची कार्यवाही, तक्रार निवारण पोर्टलवरील ( ) प्रलंबित प्रकरणांचा निपटारा, (), , अंतर्गत शेतकरी ओळख पडताळणी, संदर्भातील प्रलंबित कामे तसेच महसूल अभिलेख (पान २ वर)

### वर्षावास प्रारंभ सोहळा उत्साहात

## बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ वाचनास प्रारंभ, वृक्षारोपणातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**जालना । प्रतिनिधी**

गणेश नगरयोगेश नगर येथील धम्मसाधना बुद्ध विहारात वर्षावास प्रारंभ सोहळा अत्यंत भक्तिमय व मंगलमय वातावरणात पार पडला. यावेळी पूज्य भन्ते शिवली अंगुलीमाल शाक्यपुत्र थेरो यांच्या मंगल व प्रेरणादायी वाणीने भगवान बुद्धांच्या शिकवणीवर आधारित बुद्ध आणि त्यांचा धम्म या पवित्र ग्रंथाच्या सामूहिक वाचनास शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात पूज्य भन्तेजी व भिक्खू संघ यांच्या शुभहस्ते फणसाच्या वृक्षाचे वृक्षारोपण करून झाली. पर्यावरण संरक्षण व संवर्धनाचा संदेश देत धार्मिक आचरणासोबत निसर्ग संवर्धनाची जबाबदारीही प्रत्येकाने स्वीकारावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले. वृक्षारोपणानंतर उपस्थितांनी वृक्षसंवर्धनाची सामूहिक प्रतिज्ञा घेतली. यानंतर उपस्थित धम्मबंधू-भगिनींनी पूज्य भन्तेजींचे पुष्पगुच्छ अर्पण करून तसेच बुद्धवंदना सादर करत आदरपूर्वक स्वागत केले. त्रिशरण, पंचशील ग्रहण, धम्मवंदना आणि ग्रंथवाचनाच्या प्रारंभामुळे संपूर्ण परिसरात



भक्ती, श्रद्धा व आध्यात्मिकतेचे वातावरण निर्माण झाले.

पूज्य भन्ते शिवली अंगुलीमाल शाक्यपुत्र थेरो यांनी आपल्या मार्गदर्शनपर प्रवचनात वर्षावासाचे महत्त्व विशद करताना भगवान बुद्धांनी दिलेल्या करुणा, मैत्री, प्रज्ञा आणि समतेच्या संदेशाचे आचरण जीवनात करण्याचे आवाहन केले. धम्माचा अभ्यास, शीलाचे पालन आणि सदाचाराची वाटचाल यामुळेच व्यक्ती, समाज आणि राष्ट्र अधिक सुदृढ होऊ शकते, असे त्यांनी सांगितले. या प्रसंगी धम्मसाधना बुद्ध विहाराचे अध्यक्ष दिलीप शिंदे, सचिव प्रमोदकुमार डोंगरदिवे, तलवार साहेब, फकिरा वाघ यांच्यासह महिला मंडळातील वाघमारे आई, सत्यवती शिंदे, गायकवाड आई, मोरे ताई, मलवार ताई, साळवे ताई, गयाबाई वारुळे, ब्रम्हराक्षस आई तसेच मोठ्या संख्येने उपासक-उपासिका उपस्थित होते.

कार्यक्रमाचा समारोप बुद्धवंदना, धम्मवाचन आणि सर्वांच्या मंगलकामनेच्या प्रार्थनेने झाला. वर्षावासाच्या निमित्ताने आगामी काळात नियमित धम्मवाचन, प्रवचने आणि विविध सामाजिक-धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

महाराष्ट्र सैनिक शिक्षक प्रसारक मंडळ, संचालित

**श्री. संत कबीर उच्च प्राथमिक शाळा (अल्पसंख्याक) संजय नगर जुना जालना**

**या ठिकाणी खालील पदे भरणे आहेत.**

**पाहिजेत**

| | |
|---|---|
| १. एच. एस.सी.डी.एड (टीईटी उत्तीर्ण) | ओबीसी १ जागा<br>अनुसुचित जाती (एस. सी) १ जागा<br>व्हीजीएनटी १ जागा |

दिनांक -०२/०८/२०२६ रोजी सकाळी ११. वा खालील ठिकाणी मुलाखतीस आपल्या मुळ कागदपत्रांसह हजर रहावे

**ठिकाण :** श्री. संत कबीर उच्च प्राथमीक शाळा, संजय नगर जुना जालना, ता. जि. जालना

**अध्यक्ष** **सचिव**

**महाराष्ट्र सैनिक शिक्षण प्रसारक मंडळ**

**जालना ता.जि. जालना**

# संपादकीय...

## गुन्हे उघडकीस आणण्याइतकेच ते रोखणेही महत्त्वाचे!

जालना शहरात अवघ्या काही तासांच्या अंतराने घडलेल्या दोन घटनांनी कायदा व सुव्यवस्था व्यवस्थेचे दोन वेगवेगळे पैलू समोर आणले आहेत. एका बाजूला भररस्त्यात झालेल्या खुनाच्या गुन्ह्याचा कदीम जालना पोलिसांनी अवघ्या चार तासांत छडा लावून आरोपीला अटक केली, तर दुसऱ्या बाजूला गंभीर गुन्हा करण्याच्या तयारीत असलेल्या एका तरुणाला गावठी पिस्तूल आणि जिवंत काडतुसासह ताब्यात घेत संभाव्य मोठी दुर्घटना टाळली. या दोन्ही कारवाया पोलिसांच्या तत्परतेचे उदाहरण असल्या तरी त्या समाजासाठी अनेक गंभीर प्रश्नही निर्माण करतात.

खुनाचा आरोपी काही तासांत जेरबंद होणे ही तपास यंत्रणेची कार्यक्षमता दर्शवणारी बाब आहे. घटनास्थळ सील करणे, फॉरेन्सिक पथकाची मदत घेणे, सीसीटीव्ही, गोपनीय माहिती आणि तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीपर्यंत पोहोचणे ही आधुनिक तपासपद्धतीची सकारात्मक बाजू आहे. अशा वेगवान तपासामुळे नागरिकांमध्ये पोलिसांबद्दल विश्वास निर्माण होतो आणि गुन्हेगारांमध्ये कायद्याचा धाक वाढतो.

दुसरी घटना आणखी महत्त्वाची आहे. कारण येथे गुन्हा घडून गेल्यानंतर तपास झाला नाही, तर गुन्हा घडण्यापूर्वीच तो रोखण्यात पोलिसांना यश आले. गुप्त माहितीच्या आधारे गावठी पिस्तूल आणि जिवंत काडतूस जप्त करून एका संशयिताला अटक करण्यात आली. ही प्रतिबंधात्मक पोलिसिंग अधिक प्रभावी ठरते. कारण एक जीव वाचवणे हे शंभर गुन्हे उघडकीस आणण्यापेक्षा अधिक मोलाचे असते.

मात्र या दोन घटनांमधून एक चिंताजनक वास्तवही समोर येते. जालना शहरात गावठी पिस्तुले सहज उपलब्ध होत आहेत का? तरुणांच्या हातात धारदार शस्त्रे आणि अग्निशस्त्रे कशी पोहोचत आहेत? किरकोळ वाद, वैयक्तिक वैमनस्य किंवा टोळीयुद्धाची मानसिकता वाढत आहे का? या प्रश्नांची उत्तरे केवळ गुन्हे दाखल करून मिळणार नाहीत. त्यासाठी शस्त्रपुरवठ्याचे जाळे उद्ध्वस्त करणे, गुन्हेगारी प्रवृत्तीवर सातत्याने नजर ठेवणे आणि युवकांना गुन्हेगारीपासून दूर ठेवण्यासाठी सामाजिक उपक्रम राबविणे तितकेच आवश्यक आहे. आज गुन्हेगार तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक सावध झाले आहेत. त्यामुळे पोलिसांनीही तंत्रज्ञान, फॉरेन्सिक विज्ञान, डिजिटल पुरावे आणि माहिती संकलन यांचा अधिक प्रभावी वापर करणे ही काळाची गरज आहे. त्याचबरोबर नागरिकांनीही संशयास्पद हालचाली, बेकायदेशीर शस्त्रांची माहिती किंवा गुन्हेगारीची चाहूल लागल्यास तातडीने पोलिसांना माहिती देण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. कायदा-सुव्यवस्था ही केवळ पोलिसांची नव्हे, तर समाजाचीही सामूहिक जबाबदारी आहे. कदीम जालना पोलिसांनी केलेल्या या दोन्ही कारवाया नक्कीच कौतुकास्पद आहेत. मात्र या यशाचा खरा अर्थ तेव्हाच सिद्ध होईल, जेव्हा अशा घटना वारंवार घडणार नाहीत. गुन्हा घडल्यानंतर आरोपी पकडणे हे पोलिसांचे कर्तव्य आहे; परंतु गुन्हा घडूच न देणे हे अधिक मोठे यश ठरते. जालना शहरात सुरक्षिततेचे वातावरण टिकवून ठेवण्यासाठी पोलिसांची सतर्कता, नागरिकांचे सहकार्य आणि समाजातील सकारात्मक सहभाग या तिन्ही गोष्टींचा समतोल राखणे आज अत्यावश्यक बनले आहे.

# एस. टी. ची. पार्सल सेवा बंद झाल्यामुळे व्यापारी परेशान



**जाफराबाद - प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) पार्सल वाहतूक सेवेच्या कंत्राटदाराचा परवाना गेल्या महिन्यात ६वाजता अचानक रद्द करण्यात आला ६वाजता सर्व महाराष्ट्र भरात अचानक पार्सल आफिस ला सिल मारन्यात आहे अंगार प्रमुख काने ताबे घेतले एसटीच्या पार्सल या सेवेला ब्रेक मध्या रात्री अचानाक बंद झाले . त्यामुळे सिडको जालना सिलोड चिखली पुणे शिवाजी नगर असे महाराष्ट्र मधे व एम पी आगारातून दररोज होणारी पार्सलची सेवा आवक-जावक आता शून्यावर आली आहे.मक्तेदाराचा परवाना १९ जूनला रद्द केल्यानंतर एसटी महामंडळाने लागलीच पार्सल कार्यालयांचा ताबा घेतला. मात्र, नवीन बुकिंग पूर्णपणे बंद आहे.हे पार्सल कार्यालयात जाफराबाद महाराष्ट्र भर बंद आहे व्यवस्थापक, कर्मचारी व हमाल पार्सल चालक मिळू बरेच काम करत होते. त्यांच्या रोजगाराची समस्या निर्माण झाली आहे. मक्ता बंद करण्यात येत असल्याची पूर्वसूचना कोणालाच दिलेली नव्हती. त्यामुळे आधी - बुकिंग झालेल्या पार्सलच्या वाटपाची समस्या निर्माण झाली. महामंडळाने कार्यालयाचा ताबा घेतला आहे. परंतु पार्सल बुकिंग बंद असल्याने त्यांचेही आणि आमचेही नुकसान होत आहे, अशी माहिती मक्तेदार कंपनीच्या बुकिंग बंद झाली पासुन पार्सल पाठवनारे आता पोस्ट आफिस कड़े जायाला सुरवाद झाली दिसत आहे असे महाराष्ट्र एस टी पार्सल लवकर सुरु झाले नाही तर एस टी चे पार्सल पाठवनारे खाजगी ट्रांसपोर्ट कड़े पोस्ट आफिस ला मोटा फ़ायदा दिसत आहे एस टी पार्सल सेवा असी जास्त दिवस बंद राहीली तर टोनही ठेका घेनानाही घेतला तर पैसे निघनार नाही असे जाफराबाद तालुक्यात पार्सल चालक सय्यद शोएब सैय्यद अय्यूब हे बोलत आगर प्रमुख रंजित राजपुत वरिष्ठ कार्यालयाकडून प्राप्त होणाऱ्या आदेशांनुसार पार्सल सेवेबाबत निर्णय घेतला जाईल.

# नवी मुंबई विमानतळ उभारणीच्या अनुभवाचा उपयोग करुन विमानतळ विकासाची कामे कालबद्ध पद्धतीने पूर्ण करावीत - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई - प्रतिनिधी**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारणीचा यशस्वी अनुभव लक्षात घेऊन महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी (एमएडीसी)ने पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विकासही निश्चित कालमर्यादेत पूर्ण करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. शिर्डी आंतरराष्ट्रीय विमानतळावरील एअर कार्गो कॉम्प्लेक्ससह विविध पायाभूत सुविधा आगामी कुंभमेळा-२०२७ पूर्वी पूर्ण करण्यासाठी आवश्यक यंत्रणा बळकट करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या (एमएडीसी) संचालक मंडळाची ९३ वी बैठक मंत्रालयात झाली. बैठकीस एमएडीसीचे कार्यकारी संचालक दीपक कपूर, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, गृहनिर्माण विभागाचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अन्बलगन, मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, आयुक्त विपिन इटनकर तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी स्थापन करण्यात आलेल्या संयुक्त कंपनीमध्ये एमएडीसीसोबत सिडको, एमआयडीसी आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांचा सहभाग असून या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी हडकोमार्फत ६ हजार कोटी रुपयांच्या कर्जास मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या अंमलबजावणीला गती देत सर्व कामे नियोजित वेळेत पूर्ण करावीत. कुंभमेळा-२०२७ दरम्यान देश-विदेशातून मोठ्या संख्येने भाविक शिर्डीत येणार असून चार्टर्ड विमानांचीही मोठ्या प्रमाणात ये-जा अपेक्षित आहे. त्यामुळे शिर्डी विमानतळावरील टॅक्सीवे, एप्रन, एअर कार्गो कॉम्प्लेक्स तसेच इतर आवश्यक सुविधांची कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. राज्यातील विमानतळांच्या विकासाला वेग एमएडीसीमार्फत नांदेड, नाशिक, जळगाव, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, गोंदिया आणि अमरावती या सात विमानतळांचा विकास करण्यात येत असून रत्नागिरी विमानतळाचे काम अंतिम टप्प्यात आहे. बारामती विमानतळाच्या आधुनिकीकरणासाठी ६४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून लातूर विमानतळासाठी ३८ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. कराड विमानतळाच्या १,७०० मीटर धावपट्टीच्या विस्ताराची कार्यवाही सुरू असून भविष्यात येथे नाईट लँडिंगची सुविधा उपलब्ध करण्याचे नियोजन आहे. तसेच चंद्रपूर येथील फ्लाईंग क्लब तसेच धाराशिव आणि यवतमाळ येथील विमानतळ करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. नांदेड विमानतळावर आधुनिक टर्मिनल नांदेड विमानतळावर अत्याधुनिक प्रवासी टर्मिनल उभारण्यात येणार असून येथे प्रवासी संख्येत सातत्याने वाढ होत आहे.

सध्या नऊ विमानसेवा उपलब्ध असून चंदीगड आणि अमृतसर येथून नांदेडसाठी थेट विमानसेवा सुरू करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. एमएडीसीकडून मिहान परिसरात विविध प्रकल्पांना चालना मिहान परिसरात एमएडीसीच्या माध्यमातून विविध विकास प्रकल्प राबविण्यात येत आहेत. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थच्या माध्यमातून एम्सच्या धर्तीवर भव्य रुग्णालय उभारण्याचा प्रस्ताव असून त्यासाठी राज्य शासनाकडून जमीन उपलब्धतेस मंजुरी देण्याची विनंती बैठकीत करण्यात आली. गडचिरोली जिल्ह्यात नवीन विमानतळासाठी जागा निश्चितीची प्रक्रिया सुरू असून अमरावती विमानतळावर फ्लाईट ट्रेनिंग स्कूल सुरू होत असून नाईट लँडिंग सुविधेसाठी डीजीसीएकडून अंतिम तपासणी करण्यात येणार आहे.

विमानसेवांना गती, सी-प्लेन सेवा आणि प्रशिक्षण केंद्र सोलापूरच्या होटगी विमानतळासाठी उडान योजनेअंतर्गत राज्य शासनाने आवश्यक निधी उपलब्ध करून दिला असून लवकरच मुंबईसोलापूर विमानसेवा सुरू करण्याचे नियोजन आहे.

पवना, कोराडी, गंगापूर, रत्नागिरी आणि गणपतीपुळे येथे सी-प्लेन सेवा सुरू करण्याच्या दृष्टीनेही चर्चा करण्यात आली. देश व राज्यातील विमान प्रवासी २०३५ पर्यंत मोठ्या संख्येने वाढणार आहेत. त्या दृष्टीने उपाययोजना करण्यासाठी यावेळी चर्चा करण्यात आली. रत्नागिरी विमानतळावरील कामे जवळपास पूर्ण झाली असून हा परिसर कोस्ट गार्डच्या नियंत्रणाखाली असल्यामुळे आवश्यक परवानग्या प्राप्त करून विमानतळ लवकरच कार्यान्वित करण्यासाठी कार्यवाही सुरू असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

पान १ व ४ वरुन...

### महापौरांनी केवळ...

आली आहे. अनेक ठिकाणी मंजूर नकाशानुसार अंडरग्राऊंड पार्किंग असणे अपेक्षित असताना त्याठिकाणी व्यावसायिक गाळे उभारण्यात आल्याची चर्चा आहे. त्यामुळे अशा बांधकामांची चौकशी करून नियमबाह्य प्रकार आढळल्यास कारवाई करावी, जेणेकरून भविष्यात पावसामुळे व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळता येईल, अशी मागणी होत आहे.

दरम्यान, महापौर वंदना मगरे यांनी नागरिकांच्या अडचणी गांभीर्याने घेत प्रशासनाला तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश दिल्याबद्दल स्थानिकांनी त्यांचे स्वागत केले. मात्र, प्रत्येक पावसाळ्यात जलभरावाची पुनरावृत्ती होत असल्याने केवळ पाहणी, आदेश आणि आश्वासने नकोत, तर प्रत्यक्षात प्रभावी व कायमस्वरूपी कामे होणे गरजेचे असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले. आता महापालिकेच्या सूचनांची अंमलबजावणी किती वेगाने होते आणि माऊली नगरसह शहरातील जलभरावाच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा कधी निघतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### एमआयडीसी पायाभूत...

घेण्यात आला. उद्योगांना विविध शासकीय सेवांचा लाभ मैत्री पोर्टलच्या माध्यमातून ऑनलाइन पद्धतीने मिळावा, तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन नवीन उद्योग उभारणीला चालना द्यावी, यावरही बैठकीत भर देण्यात आला. यावेळी कृषी विभागाच्या सहकार्याने जालना जिल्ह्याला सिल्क हब म्हणून विकसित करण्याच्या संकल्पनेवर सविस्तर चर्चा झाली. रेशीम उद्योगाच्या माध्यमातून ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती आणि उद्योगवाढीस चालना मिळू शकते, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

जिल्ह्याच्या निर्यातवाढीसाठी सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, औद्योगिक संघटना आणि संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करून सातत्याने पाठपुरावा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले. जालना जिल्ह्याची औद्योगिक क्षमता अधिक प्रभावीपणे देश-विदेशातील बाजारपेठांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्व विभागांनी संयुक्तपणे प्रयत्न करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

बैठकीत विविध उद्योगांशी संबंधित अडचणी, पायाभूत सुविधांतील सुधारणा, स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यासाठी आवश्यक उपाययोजना तसेच उद्योगवाढीस पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करण्यावर एकमत झाले. जिल्ह्याच्या सर्वांगीण औद्योगिक विकासासाठी अशा बैठका प्रभावी ठरत असून, विविध विषयांवर लवकरात लवकर कार्यवाही करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.

### जिल्हाधिकारी आशिमा...

अद्ययावतीकरण या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. संबंधित सर्व अधिकाऱ्यांना प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करून शासनाने निश्चित केलेल्या कालमर्यादेत कामकाज पूर्ण करण्याचे निर्देशही देण्यात आले. जिल्हाधिकारी यांनी महसूल प्रशासन अधिक गतिमान, पारदर्शक व नागरिकाभिमुख करण्यासाठी सर्व मंडळ अधिकारी व तलाठी यांनी नियमित क्षेत्रभेटी घेऊन अभिलेख अद्ययावत ठेवावेत, ऑनलाईन सेवांमधील प्रलंबित प्रकरणांचा त्वरित निपटारा करावा आणि नागरिकांना दर्जेदार सेवा उपलब्ध करून द्याव्यात, असे स्पष्ट निर्देश दिले.

### मुसळधार पावसाने...

यांच्या घरासह परिसरात गुडघाभर ते सुमारे तीन फूट सांडपाणी शिरल्याने मोठे नुकसान झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे जालना महानगरपालिकेच्या स्वच्छता मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

उद्योजक वीरेंद्र पटेल यांनी महापालिका आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सांडपाणी निचरा व्यवस्था अनेक दिवसांपासून स्वच्छ न केल्यामुळे ती पूर्णपणे तुंबली आहे. परिणामी मुसळधार पावसाचे पाणी आणि सांडपाणी परिसरात साचून कारखाना, घर आणि इतर मालमत्तेमध्ये घुसले. या पाण्यामुळे यंत्रसामग्री, साठवलेले साहित्य, जनावरांचा चारा तसेच इतर वस्तूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून आर्थिक फटका दिवसेंदिवस वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले.

पटेल यांनी आणखी आरोप केला की, सांडपाण्याच्या नैसर्गिक वाहिनीवर एका स्थानिक नगरसेवकाने अतिक्रमण केल्यामुळे पाण्याचा प्रवाह अडला आहे. त्यामुळे लक्ष्मीनारायणपुरा परिसरातील सांडपाणी त्यांच्या परिसराकडे वळून ही गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. या आरोपांची निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

या प्रकरणी त्यांनी महापालिका आयुक्तांकडे तातडीने प्रत्यक्ष पाहणी करण्याची, अधिकाऱ्यांना घटनास्थळी पाठविण्याची, तुंबलेली नाली त्वरित साफ करून पाण्याचा निचरा सुरळीत करण्याची तसेच अतिक्रमणामुळे निर्माण झालेल्या अडथळ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. याशिवाय झालेल्या आर्थिक नुकसानीचे पंचनामे करून त्याचे मूल्यांकन करण्यात यावे आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात याव्यात, अशीही मागणी त्यांनी केली आहे.

साचलेल्या सांडपाण्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून डासांची उत्पत्ती, संसर्गजन्य आजारांचा धोका आणि नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. नागरिकांनीही महापालिकेने केवळ स्वच्छता मोहिमेची घोषणा न करता प्रत्यक्षात नाले, गटारी आणि मलनिःसारण व्यवस्था नियमितपणे स्वच्छ ठेवावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

दरम्यान, या घटनेमुळे शहरातील पावसाळापूर्व नाला सफाई आणि मलनिःसारण व्यवस्थेच्या कामांबाबत पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित झाले असून महापालिका प्रशासन या गंभीर तक्रारीची किती तत्परतेने दखल घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

जुना जालना परिसरातील मुख्य रस्ते, अंतर्गत गल्लीबोळ तसेच सखल भाग पूर्णपणे जलमय झाल्याने नागरिकांना घराबाहेर पडणेही कठीण झाले. अनेक दुचाकी वाहने बंद पडली, तर काही वाहनचालकांना पाण्यातून वाहने ढकलत न्यावी लागली. शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना विशेषतः मोठा त्रास सहन करावा लागला. नागरिकांनी आरोप केला की, महानगरपालिकेकडून स्वच्छता मोहिमा आणि नालेसफाईचे दावे केले जात असले तरी प्रत्यक्षात अनेक नाले गाळ, प्लास्टिक व कचऱ्याने तुंबलेले आहेत. त्यामुळे प्रत्येक पावसात हीच परिस्थिती निर्माण होत असून प्रशासनाकडून कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली.

साचलेल्या पाण्यामुळे डासांची उत्पत्ती वाढण्याची शक्यता असून डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया यांसारख्या संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण झाला आहे. तसेच सांडपाणी रस्त्यांवर आल्याने दुर्गंधी पसरून परिसरातील स्वच्छतेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

स्थानिक नागरिकांनी महापालिका प्रशासनाकडे तातडीने नाले व गटारींची यंत्रणेद्वारे साफसफाई करण्याची, पाण्याचा निचरा सुरळीत करण्याची, अतिक्रमणामुळे अडथळा निर्माण झालेल्या नाल्यांची पाहणी करून कारवाई करण्याची तसेच पावसाळ्यात आपत्कालीन पथके तैनात करण्याची मागणी केली आहे.

दरम्यान, प्रत्येक वर्षी पावसाळ्यात जुना जालना परिसरात निर्माण होणाऱ्या जलभरावाच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात यावी, अन्यथा नागरिकांचा रोष आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात वारंवार उद्भवणारी ही परिस्थिती महानगरपालिकेच्या नियोजन आणि देखभाल व्यवस्थेतील त्रुटी अधोरेखित करत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.

### मागणी नसताना...

इतर बँकांकडून देखील अशाच प्रकारे परस्पर पीक कर्जाचे नूतनीकरण झाल्याची शक्यता व्यक्त केली आहे. त्यामुळे अशा सर्व प्रकरणांची स्वतंत्र चौकशी करून परस्पर नूतनीकरण करण्यात आलेल्या पीक कर्जधारकांचा कर्जमाफी योजनेत समावेश करावा, तसेच बँकांच्या मनमानीचा आर्थिक फटका शेतकऱ्यांना बसू नये, अशी मागणी शेतकरी संघटना व बाधित शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

शेतकऱ्यांचा सवाल असा आहे की, ''बँकेच्या किंवा संबंधित संस्थांनी केलेल्या मनमानीचे पाप शेतकऱ्यांच्या माथी का मारले जाते?'' त्यामुळे शासनाने या प्रकरणात हस्तक्षेप करून न्याय द्यावा व संबंधित बँक व संस्थांवर कार्यवाही करावी अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### वारी भजन...

व्यक्त केले. वंदनिय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गजानन महाराज अशा थोर संतांच्या रचना आणि संदेश संगीताच्या माध्यमाने समाजापर्यंत पोचविला जातो. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये संत साहित्य, भजन याबद्दल जाणीव जागृती करण्यात आली.

कार्यक्रमाची सांगता राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या सुप्रसिद्ध कवन रघुपति राघव राजाराम, पतित पावन सीताराम याने झाली,

या प्रसंगी श्री.गुरुदेव सेवाश्रम, शेगाव .संत गजानन महाराज व वंदनिय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पालखी चे संचालक हभप सुशिल महाराज वणवे पालखी व्यवस्थापक अध्यक्ष, शेगांव आश्रम,

श्री रामरावजी पाटेखेडे पालखी पुजारी, श्री दिपकजी लुले गुरूजी हार्मोनियम व गायक,

श्री बाळकृष्णजी झाडोकार प्रवास व्यवस्थापन, श्री नितिनजी इंगळे तबला व गायक, श्री कृष्णाजी बराटे तबला वादक, श्री संदिपजी घुगे गायक, श्री गणेशजी वरूडकर औषधी विभाग,

श्री किशोरजी शेंडे वाङःमय विभाग, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामचंद्र भिसे यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वृक्षरोपे भेट देवून मान्यवरांचे स्वागत केले.

प्रसंगी संगीत विभाग प्रमुख, डॉ.रवींद्र इंगळे, डॉ. पल्लवी कुलकर्णी, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष प्रमुख,डॉ. संगीता अवचार, डॉ.अरुण पडघन, प्रा, निर्मला जाधव, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. महेश जाधव, डॉ.संगीता लोमटे, डॉ. ओमप्रभा लोहकरे, डॉ.गणेश जाधव, प्रा. निकिता कुलकर्णी, मुख्य लिपिक वैजनाथ गाडगे सर्व प्राध्यापक वृंद, कर्मचारी,विद्यार्थिनी याची उपस्थिती होती.

### राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये...

शिक्षण, वैद्यकीय शिक्षण व संशोधन तसेच आयुर्वेद संचालनालयाच्या पुणे व मुंबई येथील संचालकांना २१ जुलै २०२६ रोजीच्या पत्रान्वये पुन्हा एकदा कडक सूचना देण्यात आल्या आहेत.

कोणताही पात्र अल्पसंख्याक विद्यार्थी केवळ प्रमाणपत्राच्या अभावी प्रवेशापासून वंचित राहणार नाही, याची सर्व अनुदानित व विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांनी नोंद घ्यावी, असे आवाहन डॉ. माधवी खोडे चवरे , सचिव, अल्पसंख्याक विकास विभागाने केले आहे.

### अन्नधान्य, कडधान्य...

स्पर्धेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्याच्या नावावर जमीन असणे व ती जमीन स्वतःच्या मशागतीखाली असणे आवश्यक आहे. एका शेतकऱ्याला एकापेक्षा अधिक पिकांसाठी स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. मात्र भात पिकासाठी किमान २० गुंठे, तर इतर सर्व पिकांसाठी ४० गुंठे सलग क्षेत्रावर लागवड असणे आवश्यक आहे.

ऑनलाईन अर्ज करताना फार्मर आयडी, प्रवेश शुल्क भरल्याची पावती, आदिवासी गटातील शेतकऱ्यांसाठी जात प्रमाणपत्र तसेच बँक खाते किंवा पासबुकच्या पहिल्या पानाची प्रत अपलोड करावी लागणार आहे.

मूग व उडीद पिकांसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२६, तर ज्वारी, बाजरी, मका, तूर, सोयाबीन, भुईमूग व सूर्यफूल या पिकांसाठी ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत अर्ज करता येणार आहेत. स्पर्धेसाठी सर्वसाधारण गटातील शेतकऱ्यांना ₹३००, तर आदिवासी गटातील शेतकऱ्यांना ₹१५० प्रवेश शुल्क भरावे लागणार आहे.

स्पर्धेतील विजेत्यांना तालुका, जिल्हा आणि राज्य स्तरावर आकर्षक रोख पारितोषिके दिली जाणार आहेत. तालुका स्तरावर अनुक्रमे ₹५ हजार, ₹३ हजार आणि ₹२ हजार, जिल्हा स्तरावर ₹१० हजार, ₹७ हजार आणि ₹५ हजार, तर राज्य स्तरावर ₹५० हजार, ₹४० हजार आणि ₹३० हजार अशी पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत. कृषी विभागाच्या संकेतस्थळावरील पीक स्पर्धा नोंदणी या टॅबद्वारे शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज करावेत. तसेच स्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी गहीनीनाथ कापसे यांनी केले आहे.

### बारा गाव...

प्रदर्शन पुंजाराम आचलखांब यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गजानन अचलखांब, प्रशांत अचलखांब, सिद्धार्थ अचलखांब, दुर्योधन अचलखांब आणि बाजीराव अचलखांब यांनी विशेष परिश्रम घेतले.

तसेच राहुल लहाने, अभिजीत अचलखांब, किशोर आचलखांब, महिंद्र अचलखांब, शरद आचलखांब यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. कार्यक्रमास बारा गाव गटातील बौद्ध उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याने संपूर्ण परिसर धम्ममय वातावरणाने भारावून गेला.

# गुरु कृपेनेच जीवनाचे खऱ्या अर्थाने सार्थक - ह. भ. प विश्वभर महाराज माळोदे

## दैठना खुर्द येथे गुरु पौर्णिमेनिमित्त भव्य कीर्तन सोहळा संपन्न

**परतूर - प्रतिनिधी**

श्री गुरु गंगाभारती बाबा संस्थान ट्रस्ट, दैठना खुर्द येथे गुरु पौर्णिमेनिमित्त ह.भ.प. रामायणाचार्य विश्वभर महाराज माळोदे यांच्या भव्य कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आपल्या कीर्तनात बोलताना हभप माळोदे महाराज म्हणाले की, ''गुरु कृपेनेच माणसाच्या जीवनाचे खऱ्या अर्थाने सार्थक होते. ज्याच्या जीवनात गुरु नाही, त्याच्या जीवाला महत्त्व नाही. जीवनातील अंधार दूर करून प्रकाशाची योग्य वाट दाखवण्यासाठी गुरु अत्यंत आवश्यक असून, सकाळची सुरुवात गुरुदर्शनाने करून आपल्या कामाचा श्रीगणेशा करावा,'' असा मोलाचा संदेश त्यांनी दिला. तसेच, संसारात गुरुकृपेशिवाय तरणोपाय नाही, मात्र परमार्थ करण्यासाठी प्रपंच सांभाळून त्यातील आसक्ती दूर ठेवावी लागते, असे प्रतिपादन त्यांनी केले. या पवित्र गुरु पौर्णिमा महोत्सवाचे औचित्य साधून परिसरातील भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. गुरुकृपा प्रोव्हिजनचे अमोल सवणे, भरतभूषण सवणे, ओमसाई इंटरप्राईजेसचे राहुल भास्करराव सातोनकर, बद्रीनाथ डव्हारे यांच्या वतीने महाप्रसादाचा लाभ भाविकांना देण्यात आला. या गुरु पौर्णिमा धार्मिक सोहळ्याला परिसरातील राजकीय सामाजिक, व्यापारी, शेतकरी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याच कार्यक्रमादरम्यान, शासकीय सेवा पूर्ण करून नुकतेच सेवा निवृत्त झालेले उपविभागीय कृषी अधिकारी रामेश्वर रोडगे यांचा शेतकऱ्यांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. एम. डी. सवणे, सुरेश



सवणे, गणेश सवणे, विठ्ठल उगले, भास्करराव सातोनकर, सुधाकर सातोनकर, सुधाकर सवणे, राजेभाऊ काटकर, प्रल्हादराव सवणे आणि अमृतराव सवणे आदीमान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ व सत्कारचिन्ह देऊन रोडगे यांचा गौरव करण्यात आला. परिसरातील शेतकऱ्यांशी आणि भाविकांशी जुळलेली आपुलकीची नाती व त्यांच्या सेवाकाळातील उल्लेखनीय योगदानाबद्दल उपस्थितांनी सत्कारमूर्तींचा गौरव करत त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## परतूरच्या किड्स वर्ल्ड इंग्लिश स्कूल प्रकरणी बबनराव लोणीकरांचा पाठपुरावा; शिक्षणमंत्र्यांकडे मान्यता रद्द करण्याची मागणी

### आठ दिवसांत नियमांनुसार कार्यवाही करण्याचे शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांचे आश्वासन

**मुंबई । प्रतिनिधी**

परतूर येथील किड्स वर्ल्ड इंग्लिश स्कूल प्रकरणाला आता राजकीय आणि प्रशासकीय स्तरावर वेग आला असून, माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी गुरुवारी मुंबई येथे राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांची भेट घेऊन या प्रकरणाची सविस्तर माहिती दिली. विद्यार्थी, पालक आणि शिक्षण व्यवस्थेच्या हिताचा विचार करून संबंधित शाळेची मान्यता तातडीने रद्द करण्यात यावी तसेच या प्रकरणातील दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली.

बैठकीदरम्यान आमदार लोणीकर यांनी संबंधित प्रकरणातील विविध बाबी, पालकांच्या तक्रारी तसेच विद्यार्थ्यांवर होणाऱ्या परिणामांची माहिती शिक्षणमंत्र्यांसमोर मांडली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्याशी कोणतीही तडजोड होऊ नये आणि अशा प्रकारच्या घटनांना आळा बसावा, यासाठी शासनाने तातडीने हस्तक्षेप करण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावर शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून, संबंधित विभागाकडून सर्व बाबींची तपासणी करून नियमांनुसार आवश्यक ती कारवाई पुढील आठ दिवसांत करण्यात येईल, असे आश्वासन दिल्याची माहिती आमदार लोणीकर यांनी दिली. तसेच दोषी आढळणाऱ्यांविरोधात कायदेशीर प्रक्रियेनुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

आमदार लोणीकर यांनी सांगितले की, शिक्षण क्षेत्रातील कोणत्याही प्रकारच्या गैरप्रकारांना शासनाने पाठीशी घालू नये. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित, पालकांचा विश्वास आणि शिक्षण व्यवस्थेची विश्वासार्हता कायम राखण्यासाठी दोषींवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. या प्रकरणाचा शेवट होईपर्यंत आपण पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या भेटीनंतर परतूर परिसरातील पालक आणि नागरिकांचे लक्ष आता शिक्षण विभागाच्या पुढील कारवाईकडे लागले आहे. शासनाने दिलेल्या आश्वासनानुसार आठ दिवसांत कोणता निर्णय घेतला जातो आणि संबंधित शाळेविरुद्ध कोणती प्रशासकीय व कायदेशीर कारवाई होते, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. दरम्यान, किड्स वर्ल्ड इंग्लिश स्कूल प्रकरणामुळे जिल्ह्यातील खासगी शाळांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, शिक्षण विभागाने अशा प्रकरणांची सखोल चौकशी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांविरुद्ध कठोर भूमिका घ्यावी, अशी मागणी पालक व नागरिकांकडून होत आहे.

## राष्ट्रीय खाद्यतेल अभियान : तेलबिया काढणी पश्चात पायाभूत सुविधा (तेल काढणी युनिट) व गोदाम या घटकासाठी प्राप्त अर्जाची सोडत

**जालना - प्रतिनिधी**

राष्ट्रीय खाद्यतेल अभियानतेलबिया (सन २०२६-२७) अंतर्गत जालना जिल्ह्यासाठी फ्लेक्सी घटकातून गोदाम (२५० मेट्रिक टन) बांधकाम तसेच काढणी पश्चात पायाभूत सुविधा (तेल काढणी युनिट) या घटकांसाठी लाभार्थी निवडीची सोडत दि. ४ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या दालनात काढण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी जी. आर. कापसे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

राष्ट्रीय खाद्यतेल अभियानतेलबिया अंतर्गत जालना जिल्ह्यासाठी फ्लेक्सी घटकातून २५० मेट्रिक टन क्षमतेच्या गोदामाच्या बांधकामासाठी एक भौतिक लक्ष्य प्राप्त झाले असून, या घटकासाठी प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल १४.४० लाख रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येणार आहे. तसेच काढणी पश्चात पायाभूत सुविधा (तेल काढणी युनिट) या घटकासाठीही एक भौतिक लक्ष्य मंजूर असून, त्यासाठी प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा कमाल ९.९० लाख रुपयांपर्यंत अनुदान उपलब्ध आहे.

या दोन्ही घटकांसाठी इच्छुक शेतकरी उत्पादक कंपन्यांकडून तालुका कृषी अधिकारी कार्यालयामार्फत अर्ज स्वीकारण्यात आले असून, ते जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयास प्राप्त झाले आहेत. शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्राप्त अर्जांमधून लाभार्थ्यांची निवड पारदर्शक पद्धतीने सोडत काढून करण्यात येणार आहे.

सोडत प्रक्रियेदरम्यान संबंधित अधिकारी, कर्मचारी तसेच अर्जदार शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार असून, संपूर्ण प्रक्रिया त्यांच्या समक्ष पार पाडण्यात येईल. त्यामुळे संबंधित अधिकारी, कर्मचारी तसेच शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या प्रतिनिधींनी दि. ४ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयात वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी जी. आर. कापसे यांनी केले आहे.

## जालन्यातील ऊस संशोधन प्रकल्पाला मोठा दिलासा; अतिरिक्त जमीन धारणास मंजुरी

### महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा पुढाकार

**मुंबई - प्रतिनिधी**

मुंबई दिनांक ३० जुलै २०२६ मराठवाडा, विदर्भ आणि खानदेशातील ऊस शेती अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने जालना जिल्ह्यातील पाथरवाला, (ता. अंबड) येथील वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या ऊस संशोधन केंद्राकरिता आवश्यक पंपगृह उभारणीसाठी १.३८ आर अतिरिक्त जमीन धारण करण्यास महसूल विभागाने मंजुरी दिली आहे.



महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

महाराष्ट्र शेतजमीन (धारण कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ च्या कलम ४७(१)(ब) अंतर्गत ही सूट देण्यात आली आहे. शासनाने यापूर्वी मराठवाडा, विदर्भ आणि खानदेश विभागांसाठी ऊस संशोधन केंद्र उभारण्याच्या उद्देशाने संबंधित जमीन खरेदीस परवानगी दिली होती. आता वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट मांजरी (पुणे) यांच्या विनंतीनुसार संशोधनाच्या गरजा लक्षात घेऊन अतिरिक्त जमीन धारण करण्यास कायदेशीर सूट मंजूर करण्यात आली आहे. या केंद्रात नव्या ऊस जाती विकसित करणे, रोग व कीड व्यवस्थापन, ऊस उत्पादनवाढ, पाणी व्यवस्थापन, पीक पद्धती आणि इतर कृषी संशोधनावर काम करण्यात येणार आहे.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, ''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील कृषी संशोधन आणि साखर उद्योगाला अधिक सक्षम करण्यासाठी शासन सातत्याने निर्णय घेत आहे. वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटला दिलेली ही सूट केवळ संस्थेसाठी नसून मराठवाडा, विदर्भ आणि खानदेशातील लाखो ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी भविष्यातील गुंतवणूक आहे. आधुनिक संशोधन, नव्या ऊस जाती आणि उत्पादकता वाढीसाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरेल. संशोधनातून विकसित होणारे तंत्रज्ञान थेट शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीस हातभार लावेल, असा विश्वास आहे.

## जेन-झी जनरेशन गटार आहे म्हणतांना कंगनाला थोडीशी तरी वाटायला पाहिजे!

जेन-झी पिढीला गटार पिढी आहे,म्हणणाऱ्या कंगनाने स्वतःचा चेहरा आरश्यात पहावा नंतर समजेल कोण गटार आहे आणि कोण शुद्ध आहे.कंगना रानावत लोकप्रतिनिधी आहेत आणि त्या देशाचे नेतृत्व करीत आहे अशा परिस्थितीत आपण काय बोलतो याचे भान त्यांनी ठेवले पाहिजे.सर्वसामान्य जनता बोलतांना आपल्या जिभेवर थोडासा तरी ताबा ठेवतो.परंतु कंगनाला स्वतःच्या बोलण्यावर भान नसल्याचे दिसून येते. कंगना रानावत म्हणते की, पाश्चात्य प्रभावाखालील भारतीय महिलांची नवी पिढी ''जनरेशन गटर'' आहे.कंगनाने लक्षात ठेवले पाहिजे की,भारतात पाश्चात्य पध्दतीचा प्रभाव चित्रपट सृष्टीपासून वाढला आहे आणि त्यात आपणही सहभागी होता आणि आहात.सध्याच्या चित्रपटांमध्ये पाश्चात्य पध्दती प्रभावशाली होत आहे हे तुम्हाला दिसत नाही का? त्यामुळे हिंदू संस्कृतीचे वाटोळे होत आहे हे लक्षात येत नाही का?अशा परिस्थितीत तुम्ही पाश्चात्य पध्दतीचा संसदेत विरोध का करीत नाही?परंतु अभद्र वक्तव्य करून कंगनाने लोकप्रतिनिधी या पदाला कलंकित केले आहेत. जेन-झीचे आंदोलन तब्बल ३५ दिवस चालले आणि सरकारच्या माध्यमातून ३६ व्या दिवशी तोडगा निघाला.या आंदोलना दरम्यान सोनम वांगचूक यांनी उपोषण सुध्दा केले व अनेक सामाजिक संघटनांनी आणि विरोधी पक्षांनी पुर्णपणे समर्थन दिले.यावर तोडगा काढण्यासाठी सरकार मार्फत तीन फेऱ्यांच्या चर्चा झाल्या आणि सरकार सुध्दा कॉकरोच जनता पार्टी समोर झुकले. पक्ष-विपक्ष व सरकार विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा तोडगा निघावा यासाठी प्रयत्नशील होते.हे सर्व झाल्यानंतर आणि तोडगा निघाल्यानंतर युवा पिढी बद्दल घाणेरड्या दर्जाचे वक्तव्य करने एका लोकप्रतिनिधीला शोभा देत नाही असे मला वाटते.कंगनाने याचा विचार केला का की, लाखो युवा रस्त्यावर का आले? त्यांच्या भावनांना किती मोठी ठेस पोहोचली असावी याचा विचार केला का?युवकांच्या भावनांचा थोडासाही विचार न करता आपल्या चुकांवर पांघरूण घालण्यासाठी वाटेल ते घाणेरडे वक्तव्य एखाद्या लोकप्रतिनिधीने करने म्हणजे लोकशाहीला काळीमा फासणारे म्हणावे लागेल.जंतमंतरचे आंदोलन चित्रपट नसून लोकशाही आहे हे कंगनाने लक्षात ठेवले पाहिजे.आज पेपर फुटीमुळे देशाच्या शिक्षण प्रणालीवर मोठा काळा धब्बा लागला आहे आणि ही घटना संपूर्ण जगाने उघड्या डोळ्यांनी पहाली.कारण राजकीय पुढाऱ्यांचे मुले विदेशात शिकतात ते कंगणाला दिसत नाही का?आज भारतातील राजकीय



पुढाऱ्यांना आपल्या मुलांना सरकारी शाळा-महाविद्यालयाल शिकवायला लाज वाटते. राजकीय पुढाऱ्यांचे मुले जर सरकारी शाळा-महाविद्यालयात शिकली असती तर देशात पेपर फुटीचा प्रकार दिसलाच नसता व जेन-झी रस्त्यावर आल्याचे दिसले नसते.राजकिय पुढाऱ्यांचे मुले विदेशात आणि सर्वसामान्यांची मुले देशात शिकत आहे आणि त्यातही पेपर फुटी या असहय्य वेदना युवकांना कशा काय सहन होणार?आज जेन-झी देशाचे भविष्य आहे हेही लक्षात ठेवले पाहिजे.आज युवकांना काय वेदना होत आहे याची जाण कंगणाला नसावी.जेन-झीने जे काही केले ते आत्म्यातुन केले आणि कंगना जे घृणास्पद वक्तव्य केले ते राजकीय प्रेरीत आहे ही बाब कंगना राणावत ने लक्षात ठेवली पाहिजे आणि गटार जेन-झी आहे की स्वतः कंगना आहे हे सरकारने ठरवून कंगना राणावतच्या घृणास्पद वक्तव्यावर लगाम कसली पाहिजे. कंगना राणावत यांनी जेन-झीचा उल्लेख ''गटार पिढी'' असा करून युवकांच्या जखमेवर मिठ चोळण्याचे काम केले.कंगना रानावत यांनी जेन-झीचा उल्लेख ''गटार पिढी''असा केला आणि त्यांच्या ध्वनि चित्रफिती पाहून आपल्याला मळमळते,ओकाऱ्या येते असे इन्स्टाग्रामवर लिहिले.''जंतरमंतर येथे झालेली निदर्शने घाणं, कचरा आणि कुरूपतेचे दर्शन होते,असे रानावत यांनी म्हटले आहे.सोशल मीडियावर जेन-झीचे व्हायरल रील्स पाहून मला ओकारी आल्यासारखे वाटते.हे लोक ड्रग्स आणि दारू पिण्याच्या स्वातंत्र्याचा अभिमान बाळगत आहेत.

कंगना रानावतला दारू आणि ड्रग्स सारख्या नशेली पदार्थांची एवढी घृणा वाटत आहे तर आतापर्यंत सरकारने किंवा कंगनाने दारू बंदी किंवा नशेली पदार्थांबद्दल आवाज का उठवला नाही व दारू किंवा नशेली पदार्थांच्या फॅक्टऱ्या बंद का केल्या नाहीत. आपण काय बोलतो याचे भान रानावत यांनी ठेवले पाहिजे. जेन-झीच्या आंदोलनावर सरकार एकीकडे तोडगा काढत आहे तर, दुसरीकडे कंगना रानावत सीजेपीच्या आंदोलनावर अभद्र भाषा बोलुन युवा पिढीच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करीत आहे ही बाब लोकप्रतिनिधीला शोभा देत नाही.कंगना म्हणते कॉकरोच गंघगी पसरवित आहे, कंगनाजी आपण थोड्या चुकलात कॉकरोच गंधगी पसरवित नसुन गंधगी साफ करण्याचे काम करीत आहेत आणि करून दाखवले म्हणून तुम्हाला कॉकरोच गटार वाटत आहे.चित्रपटामध्ये काहीही बोलले तर चालते,परंतु इथे कृती करून दाखवावी लागते. कॉकरोच जनता पार्टी सहजच तयार झाली नसुन तुम्ही चुका केल्या म्हणून ती तयार झाली आहे आणि तुमच्या चुकांचे निराकरण करण्यासाठी ते ठाम आहेत.

कंगना म्हणते की,''मैने अपनी जिंदगी मे कभी किसी एक जगह पर इतना भद्दापन नहीं देखा'' बरोबर आहे आपण पाहुही शकत नाही.

कारण आतापर्यंत तुम्ही चित्रपटांमध्ये काम करायच्या आता तुम्हाला लोकांमध्ये करावे लागत आहे आणि लोकांनामध्ये काम करतांना कसे बोलावे याचा तुम्हाला अभ्यास नसावा.कारण तुमच्या वक्तव्यावरून भाजपाच्या नेत्यांनी सुद्धा नाराजगी व्यक्त करीत आहे.जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## संध्याविकास सरदाना म्युझिक इव्हेंट्सद्वारे आयोजित एक सुनेहरी शाम या कार्यक्रमात पद्मश्री अनुप जलोटा दिलीप सेन आणि के. रवी दादा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित




मुंबईच्या प्रतिष्ठित मेयर हॉलमध्ये संगीत आणि गायनाने भरलेल्या एका अविस्मरणीय संध्याकाळचा अनुभव घेता आला. संध्या विकास सरदाना म्युझिक इव्हेंट्सद्वारे आयोजित एक सुनेहरी शाम मुंबई में सितारों के नाम या कार्यक्रमात शहरातील नामवंत व्यक्ती तसेच उदयोन्मुख कलाकारांचा सहभाग होता.

या कार्यक्रमाचे आयोजन विकास सरदाना आणि संध्या सरदाना यांनी केले होते. विकास सरदाना हे पद्मश्री अनुप जलोटा यांचे शिष्य असून, त्यांनी आपल्या गुरूंच्या आशीर्वादाने हा भव्य कार्यक्रम साकार केला. भजन सम्राट पद्मश्री अनुप जलोटा हे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. त्यांनी दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. प्रख्यात संगीतकार दिलीप सेन आणि के. रवी दादा विशेष अतिथी म्हणून त्यांच्यासोबत मंचावर उपस्थित होते. या तीन मान्यवरांच्या उपस्थितीने ही संगीत संध्या अधिकच विशेष झाली.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. यानंतर, अनेक उदयोन्मुख गायकांनी आपल्या सांगीतिक सादरीकरणाने वातावरण भारून टाकले. नवीन कलाकारांना एक मोठे व्यासपीठ उपलब्ध करून देऊन त्यांना प्रोत्साहन देणे, हे या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण होते. सर्व सहभागी गायकांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

आयोजक विकास सरदाना म्हणाले: ''या यशस्वी कार्यक्रमाचे श्रेय मी माझे गुरू, पद्मश्री अनुप जलोटा आणि संगीतकार दिलीप सेन यांना देतो. आमचे ध्येय केवळ एक कार्यक्रम सादर करणे नव्हते, तर ज्या नवीन आवाजांना व्यासपीठाची गरज होती त्यांना समोर आणणे हे होते.''

प्रमुख पाहुणे पद्मश्री अनुप जलोटा यांनी आयोजक जोडी, संध्या-विकास सरदाना आणि देवेंद्र खन्ना यांचे अभिनंदन केले आणि म्हणाले की, असे व्यासपीठ उद्याचे तारे घडवतात. संध्या आणि विकास सरदाना यांनीही मंचावर सादरीकरण केले, ज्याला प्रेक्षकांकडून प्रचंड दाद मिळाली. अनुप जलोटा आणि दिलीप सेन यांच्या सादरीकरणाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. याप्रसंगी के. रवी दादा यांना विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ते म्हणाले, ''विकास सरदानाने नवीन प्रतिभेसाठी केलेले कार्य कौतुकास्पद आहे. केसीएफ फाउंडेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. कृष्ण चौहान यांनीही या कार्यक्रमाला हजेरी लावली आणि संगीत व समाजसेवेवर चर्चा करण्यासाठी पद्मश्री अनुप जलोटा यांची भेट घेतली. कार्यक्रमात उपस्थित असलेल्या सर्व पाहुण्यांनी आणि संगीतप्रेमींनी या ''सुवर्ण संध्याकाळ''ची प्रशंसा केली.

विकास सरदाना म्युझिक इव्हेंटच्या या संध्याकाळने मुंबईच्या संगीत क्षेत्रात एक नवीन पायंडा पाडला आहे.

मुंडे न्यूजचे सीईओ रमाकांत मुंडे यांचाही सन्मान करण्यात आला. त्यांनी या कार्यक्रमाचे जनसंपर्क (पीआर) मोठ्या कौशल्याने हाताळले.

**छायाचित्रकार: रमाकांत मुंडे, मुंबई**

# अधिकाऱ्यांना पुरस्कार, कर्मचाऱ्यांची उपासमार; जलजीवन व स्वच्छ भारत मिशनच्या कर्मचाऱ्यांचा संताप

आठ महिन्यांपासून मानधन थकीत; ३ ऑगस्टपर्यंत वेतन न मिळाल्यास मुंबईत राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा

**जालना - प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील पाणीपुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत जल जीवन मिशन आणि स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) मध्ये जिल्हा व तालुकास्तरावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचे मागील आठ महिन्यांपासून मानधन थकीत असल्याने त्यांच्यावर आर्थिक संकट ओढावले असून अनेकांवर उपासमारीची वेळ आल्यामुळे कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन सुरू केले आहे. राज्यस्तरावर वेतनाचा निधी उपलब्ध असूनही संबंधित अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे वेतन मिळण्यास विलंब होत असल्याचा आरोप आंदोलक कर्मचाऱ्यांनी केला आहे.

या पार्श्वभूमीवर राज्यभरातील पाणी व स्वच्छता विभागातील कर्मचाऱ्यांनी २३ जुलैपासून जिल्हा परिषद स्तरावर कामबंद आंदोलन सुरू केले आहे. ३ ऑगस्टपर्यंत थकीत मानधन अदा न झाल्यास राज्यभरातील कर्मचारी मुंबईतील आझाद मैदानावर एकत्र येऊन तीव्र आंदोलन छेडणार असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे.



सदरील कर्मचारी यांनी सुमारे दोन दशके जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशनच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी, जनजागृती, सर्वेक्षण आणि ग्रामीण स्वच्छतेसाठी त्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत काम करून लोकांचे आरोग्यमान उंचावण्याचे काम केले आहे. अत्यल्प मानधन, मर्यादित सुविधा आणि सातत्याने वाढणारा कामाचा ताण सहन करत त्यांनी महाराष्ट्राला राष्ट्रीय स्तरावरील अनेक सन्मान मिळवून देण्यासाठी महत्त्वाचे योगदान दिले असून देशात नाव लौकिक प्राप्त करून दिला आहे.

अलीकडेच स्वच्छ सर्वेक्षण ग्रामीण मधील उत्कृष्ट कामगिरीबद्दल राज्य पाणी व स्वच्छता मिशन कक्षाचे अतिरिक्त अभियान संचालक यांचा मुख्यमंत्री यांच्या हस्ते पंढरपूर येथे सन्मान करण्यात आला. मात्र, हा सन्मान मिळवून देण्यासाठी प्रत्यक्ष अहोरात्र मेहनत करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचेच आठ महिन्यांचे मानधन थकीत असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

अधिकाऱ्यांना पुरस्कार आणि कर्मचाऱ्यांना उपासमार असे विरोधाभासी चित्र राज्यात निर्माण झाल्याची भावना कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली आहे. राज्यस्तरावर निधी उपलब्ध असतानाही मानधन अदा होत नसल्यामुळे कर्मचाऱ्यांचा सरकार व प्रशासनावरील रोष वाढत असून, तातडीने वेतन वितरित करून हा प्रश्न सोडविण्याची मागणी त्यांनी केली आहे. दरम्यान, सरकार या प्रश्नावर कोणता निर्णय घेते आणि ३ ऑगस्टपूर्वी कर्मचाऱ्यांचे थकीत मानधन अदा होते का, याकडे राज्यभरातील जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशनच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

**जालना जिल्ह्यातील २० कर्मचारी या अभियानात सहभागी झाले असून स्वच्छता अभियानातील वैयक्तिक शौचालय, सार्वजनिक शौचालय घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, गोबर्धन, गाळ मैला व्यवस्थापन इ ग्रामपंचायतीची कामे प्रलंबित असून, शासनाने लवकरात लवकर कर्मचाऱ्यांचा वेतनाचा प्रश्न मार्गी लावावा.**

**-रमाकांत गायकवाड**
**अध्यक्ष, राज्य कृती समिती.**

# मागणी नसताना पीक कर्जाचे परस्पर नूतनीकरण; शेतकरी कर्जमाफीपासून वंचित - तालुका प्रमुख उदयसिंह बोराडे

**मंठा - प्रतिनिधी**

शेतकऱ्यांनी कोणतीही मागणी अथवा संमती दिलेली नसताना स्टेटबँक व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखांमार्फत पीक कर्जाचे परस्पर नूतनीकरण (रिन्युअल) करण्यात आल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या प्रकारामुळे अनेक पात्र शेतकरी शासनाच्या कर्जमाफी योजनेपासून वंचित राहिल्याचा आरोप होत असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.



मंठा तालुक्यातील माळतोंडी येथील शेतकरी उद्धव ताठे यांच्या पीक कर्जाचे त्यांच्या मागणीशिवाय जिल्हा मध्यवर्ती बँकेने परस्पर नूतनीकरण केल्याची तक्रार त्यांचे पुत्र आसाराम ताठे यांनी जिल्हा उपनिबंधकांकडे केली आहे. तक्रारीनुसार, सन २०२३, २०२४ आणि २०२५ या कालावधीत यांचे पिक कर्जाचे परस्पर नूतनीकरण करण्यात आले आहे.

बँकेच्या नोंदीनुसार उद्धव ताठे यांच्या नावावर २०२० मध्ये सुमारे २४ हजार ७०० रुपयांचे पीक कर्ज देण्यात आले होते. त्यानंतर हे कर्ज सोसायटीमार्फत परस्पर रिन्युअल करण्यात आल्याचा आरोप आहे. परिणामी संबंधित शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहिल्याने आर्थिक नुकसान होत आहे. या संदर्भात जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने प्राथमिक चौकशी सुरू केली असून, दोषी आढळल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे संकेत मिळत आहेत. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मंठा शाखेकडे याबाबत तक्रार प्राप्त झाली असून चौकशी सुरू असल्याची माहिती बँक अधिकाऱ्यांनी दिली आहे.

दरम्यान, बँकेच्या व्यवस्थापनाने संबंधित शेतकऱ्याने सेवा सोसायटीमार्फत रिन्युअलचा प्रस्ताव दिल्यानेच नूतनीकरण झाल्याचा दावा केला आहे. मात्र शेतकऱ्यांचे म्हणणे वेगळे असून, त्यांच्या संमतीशिवाय कर्जाचे नूतनीकरण करण्यात आल्यामुळे शासनाच्या कर्जमाफी योजनेचा लाभ गमवावा लागल्याचा आरोप त्यांनी केला आहे. दरम्यान स्टेटबँकने देखील शेकडो शेतकऱ्यांसोबत हाच प्रकार केल्याची तालुक्यात जोरदार चर्चा होत असून ह्या प्रकाराने शेतकऱ्यांचा उद्रेक वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.स्टेट बँकेच्या या मनमानीच्या संदर्भात तालुक्यातील काही शेतकरी व शेतकरी गट देखील जिल्हा निबंधकाकडे तक्रार करणार असल्याचे समजते.

या घटनेनंतर मंठा तालुक्यातील जिल्हामध्यवर्ती बँक, स्टेट बँक व *(पान २ वर)*

# वारी भजन उपक्रमातून आध्यात्म, संतवाणी आणि जनजागृती संदेश

**जालना - प्रतिनिधी**

कै.सौ.कमलताई महिला महाविद्यालय,परभणी संगीत विभागाच्या वतीने वारी भजन! हा आध्यात्म व संतविचारासह मानवतेचा संदेश देणारा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी ह.भ.प. सुशील महाराज वणवे यांनी विद्यार्थिनींना पंढरी सह ज्ञान वारीचे महत्व पटवून देत आयुष्यात आई वडीलांच्या परीश्रमाला आठवत स्वतः चांगल घडत, सुजाण समाज निर्माण करावा.चांगल शिक्षण घेत जीवनाचा समृध्द मार्ग लोकजीवनात निर्माण कामी योगदान द्यावे.संतांनी सर्वधर्मसमभावानं परिपूर्ण मानवतेचे मंदिर मानवी मना मनात उभारत खऱ्या अर्थाने माणूस घडवला असा मौलिक विचार श्री.गुरुदेव सेवाश्रम,शेगाव संचालक राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचाराचे अभ्यासक हभप.सुशील महाराज वणवे यांनी मांडला.



संतवाणीतील उपदेशाचे पालन करत युवाशक्तीनं राष्ट्रविकासाला हातभार लावत ज्ञान,वारी सारख्या उपक्रमां मुळे विद्यार्थिनींमध्ये सामाजिक एकता, राष्ट्रीयता ,मानवता आणि सामाजिक बांधिलकीची भावना अधिक दृढ होते, असे मत प्राचार्य डॉ. रामचंद्र भिसे यांनी *(पान २ वर)*

# राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशासाठी अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना वैयक्तिक अल्पसंख्याक प्रमाणपत्राची अट नाही

**मुंबई -प्रतिनिधी**

राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेताना अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना वैयक्तिक अल्पसंख्याक प्रमाणपत्राची/दाखल्याची सक्ती केली जाऊ नये, असे स्पष्ट निर्देश महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विकास विभागाने दिले आहेत. शासन निर्णयानुसार विहित केलेले पुरावे ग्राह्य धरून विद्यार्थ्यांना तात्काळ प्रवेश देण्याचे आवाहन विभागाने केले आहे. महाराष्ट्र शासनाने मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, झोराष्ट्रीयन (पारसी), जैन आणि ज्यु या ७ लोकसमूहांना ''अल्पसंख्याक लोकसमूह'' म्हणून घोषित केले आहे. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार राज्य शासनाकडून धार्मिक अथवा भाषिक अल्पसंख्याक समुदायातील व्यक्तींना वैयक्तिक स्तरावर कोणतेही वेगळे अल्पसंख्याक प्रमाणपत्र किंवा दाखला दिला जात नाही. सध्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ची प्रवेश प्रक्रिया सुरू असताना, काही शैक्षणिक संस्थांकडून विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक अल्पसंख्याक प्रमाणपत्राची मागणी केली जात असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

या पार्श्वभूमीवर अल्पसंख्याक विकास विभागाने स्पष्ट केले आहे की, १ जुलै २०१३ च्या शासन निर्णयानुसार खालीलपैकी कोणताही एक पुरावा अल्पसंख्याक असल्याचा वैध पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात यावा:

१. शाळा सोडल्याच्या दाखल्यातील (), प्रवेश नोंदवहीतील किंवा शालेय अभिलेखातील धर्म अथवा मातृभाषेची नोंद.

२. शालेय अभिलेखात नोंद नसल्यास: संबंधित धर्मप्रमुख किंवा नोंदणीकृत संस्थेने दिलेले प्रमाणपत्र (उदा. बाप्तिस्मा प्रमाणपत्र, दीक्षा प्रमाणपत्र इत्यादी).

३. पालकांचे शपथपत्र

या नियमांचे काटेकोरपणे पालन व्हावे यासाठी शालेय शिक्षण, उच्च शिक्षण, तंत्र शिक्षण, व्यवसाय *(पान २ वर)*

खरीप २०२६ पिकस्पर्धेसाठी शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज करावेत

# अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकांसाठी राज्यस्तरीय स्पर्धा; अर्ज प्रक्रिया प्रथमच पूर्णपणे ऑनलाईन

**जालना - प्रतिनिधी**

राज्यातील शेतकऱ्यांमध्ये अधिक उत्पादन घेण्याची स्पर्धात्मक भावना निर्माण करून आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रसार व्हावा, तसेच कृषि उत्पादनात वाढ व्हावी या उद्देशाने कृषी विभागामार्फत दरवर्षी राबविण्यात येणारी राज्यांतर्गत अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पिकस्पर्धा यंदाच्या खरीप हंगाम २०२६ पासून पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येणार आहे. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या ऑनलाईन पोर्टलवरून अर्ज करून या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी गहीनीनाथ कापसे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे. राज्यात विविध भागांतील प्रयोगशील शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पिकांची उत्पादकता वाढवित आहेत. अशा शेतकऱ्यांच्या कार्याचा गौरव करून त्यांना प्रोत्साहन देणे, तसेच त्यांच्या अनुभवाचा लाभ इतर शेतकऱ्यांनाही मिळावा, या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित केली जाते. यामुळे राज्याच्या एकूण कृषी उत्पादनातही मोलाची भर पडण्यास मदत होणार आहे.

यापूर्वी पिकस्पर्धेची संपूर्ण प्रक्रिया ऑफलाईन पद्धतीने राबविण्यात येत होती. मात्र प्रशासकीय कामकाजात पारदर्शकता, सुलभता आणि गतिमानता आणण्यासाठी खरीप हंगाम २०२६ पासून स्वतंत्र ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे अर्ज स्वीकारण्याची व्यवस्था सुरू करण्यात आली आहे. यंदाच्या खरीप हंगामात ज्वारी, बाजरी, मका, तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग आणि सूर्यफूल या प्रमुख पिकांसाठी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धा तालुका, जिल्हा आणि राज्य अशा तीन स्तरांवर होणार असून, तालुकास्तरावरील उत्पादकतेच्या आधारे पुढील स्तरासाठी विजेत्यांची निवड करण्यात येईल. स्पर्धा सर्वसाधारण व आदिवासी अशा दोन्ही गटांसाठी खुली आहे. *(पान २ वर)*



महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी सभेच्या कोषाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल संजय दाड यांचा भाषिक अल्पसंख्याक संघटनेतर्फे सत्कार करताना अध्यक्ष ओमप्रकाश धानवाला, कार्यकारी अध्यक्ष महेंद्रकुमार भक्कड, सचिव अशोक हुरगट, उपाध्यक्ष रामकुंवर अग्रवाल, सुखदेव बजाज, राजेन्द्र शर्मा, रामदेव श्रोत्रिय, मोहन अग्रवाल, सौ. नूतन दाड छायाचित्रात दिसत आहेत.

# बारा गाव गटांतर्गत मानेगाव खालसा येथे आषाढी पौर्णिमेनिमित्त बुद्धरूप प्रतिष्ठापना; वर्षवासाला प्रारंभ

**जालना - प्रतिनिधी**

जालना तालुक्यातील बारा गाव गटांतर्गत मौजे मानेगाव (खालसा) येथील आनंद बुद्ध विहार येथे आषाढी पौर्णिमेनिमित्त भगवान बुद्धांच्या चार फूट उंचीच्या बुद्धरूपाची प्रतिष्ठापना अत्यंत भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात बारा गाव गटातील बौद्ध उपासक-उपासिका मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



दिनांक २९ जुलै २०२६ (बुधवार) रोजी झालेल्या या कार्यक्रमासाठी आयुष्यमान रामचंद्र नारायण आचलकर यांनी विशेष प्रयत्न करून थायलंड येथून भगवान बुद्धांची सुंदर मूर्ती मानेगाव (खालसा) येथील आनंद बुद्ध विहारात आणली. या बुद्धरूपाची विधिवत प्रतिष्ठापना पूज्य भंते रेवत, पूज्य भंते पटीसेन, ॲड. ब्रह्मानंद चव्हाण, कमलताई चव्हाण, आयुष्यमान रामचंद्र आचलकर तसेच पुण्याहून आलेले त्यांचे सहकारी राजेंद्र पोटभरे यांच्या हस्ते करण्यात आली.

आषाढी पौर्णिमेपासून बौद्ध परंपरेतील पवित्र वर्षवासाला प्रारंभ होत असल्याने या शुभदिनी ''भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म'' या महत्त्वपूर्ण ग्रंथाच्या सामूहिक पठणालाही प्रारंभ करण्यात आला. पूज्य भंते पटीसेन यांच्या मार्गदर्शनाखाली आयुष्यमान राजेंद्र भीमराव आचलखांब हे या ग्रंथाचे नियमित वाचन करणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

कार्यक्रमात उपस्थितांना भगवान बुद्धांचा करुणा, प्रज्ञा, समता आणि मानवकल्याणाचा संदेश आचरणात आणण्याचे आवाहन करण्यात आले. बुद्ध धम्माच्या अध्ययनातून समाजात बंधुता, नैतिकता आणि शांततेची मूल्ये अधिक दृढ होतील, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयुष्यमान सूर्यकांत अचलखांब यांनी केले, तर आभार *(पान २ वर)*

# मराठवाडा चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे भरत गादिया यांचा सपत्नीक गौरव

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरातील ज्येष्ठ उद्योजक, समाजसेवी, दानशूर व्यक्तिमत्त्व आणि विविध सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक उपक्रमात अग्रेसर असलेले भरत बिंजराज गादिया व त्यांच्या धर्मपत्नी यांचा मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्सतर्फे धर्माबाद (जि. नांदेड) येथे आयोजित राज्यस्तरीय गौरव समारंभात सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र देऊन सपत्नीक गौरव करण्यात आला.



व्यापार क्षेत्रातील उल्लेखनीय यश, सामाजिक क्षेत्रातील सातत्यपूर्ण व प्रेरणादायी योगदान, समाजात आदर्श निर्माण करणारे कार्य आणि उद्योग-व्यापार क्षेत्राची प्रतिष्ठा उंचावणाऱ्या बहुमोल कार्याची दखल घेऊन श्री. गादिया यांना महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष रवींद्र मानिक, आ. मानसिंह पवार, आदेशपालसिंह छाबडा आदी मान्यवरांच्या हस्ते सपत्नीक सन्मानित करण्यात आले.

भरत गादिया हे श्री स्थानकवासी जैन श्रावक संघ, जालना या सेवाभावी संस्थेचे उपाध्यक्ष, जालना सराफा असोसिएशनचे कार्याध्यक्ष असून, त्यांनी रोटरी इंटरनॅशनलचे सहाय्यक प्रांतपाल हे अत्यंत मानाचे पद यशस्वीपणे भूषविलेले आहे. उद्योग-व्यवसायातील यशस्वी वाटचालीबरोबरच शिक्षण, आरोग्य, समाजसेवा, धार्मिक कार्य, दानशूर उपक्रम आणि गरजूंना मदतीचा हात देण्यामध्ये त्यांनी सातत्याने मोलाचे योगदान दिले आहे. कुटुंब, व्यवसाय आणि समाजकारण यांचा आदर्श समतोल साधत त्यांनी समाजात एक प्रेरणादायी स्थान निर्माण केले आहे.

या राज्यस्तरीय गौरव समारंभास उद्योग, व्यापार व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. या प्रतिष्ठित सन्मानाबद्दल जालना शहरातील व्यापारी, औद्योगिक, सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांनी भरत गादिया दांपत्याचे अभिनंदन केले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६**, E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.